# ॲग्रोमेट ॲडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर

## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**


### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. १४.११.२०२५

**जिल्हा : कोल्हापूर**

| मागील आठवड्यातील हवामान (०८.११.२०२५ ते १४.११.२०२५) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (१५.११.२०२५ ते १९.११.२०२५) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०८ | ०९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | दिनांक | १५ | १६ | १७ | १८ | १९ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| ३०.० | ३०.४ | ३०.२ | ३०.० | ३०.६ | ३०.२ | ३०.२ | कमाल तापमान (अं.से.) | ३० | ३० | २९ | २९ | २९ |
| १८.४ | १६.५ | १५.० | १५.३ | १६.५ | १६.० | १५.० | किमान तापमान (अं.से.) | १७ | १८ | १७ | १६ | १६ |
| ० | ० | ० | ० | ० | ० | ० | स. ढग स्थिती (आकाश) | ० | ० | २ | २ | ३ |
| ० | ० | ० | १ | ० | ० | ० | दु. | | | | | |
| ८१ | ८६ | ९० | ९४ | ९० | ७५ | ८५ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ६४ | ६१ | ६१ | ६१ | ६४ |
| ४७ | ४३ | ४१ | ४१ | ४९ | ५० | ७० | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ५० | ४८ | ४८ | ४६ | ५४ |
| ४.२ | ३.८ | ३.६ | ४.२ | ३.८ | ४.४ | ४.२ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ९ | ९ | १० | १० | ११ |
| ई. | पू. | नै. | प. | पू. | पू.ई. | ई. | स. वाऱ्याची दिशा | पू.ई. | पू.ई. | पू.ई. | पू.ई. | पू.ई. |
| पू.आ. | ई. | आ. | आ. | पू.ई. | पू.ई. | पू.ई. | दु. | | | | | |

| मागील आठवड्यातील पाऊस (मिमी) | पाऊस ०१.०१.२०२५ पासून आजपर्यंत (मिमी) | पाऊस दिवस ०१.०१.२०२५पासून आजपर्यंत |
|---|---|---|
| ०.० | १३६९.६ | ९५ |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार कोल्हापूर जिल्ह्यामध्ये दिनांक १५ ते १९ नोव्हेंबर दरम्यान आकाश मुख्यत: स्वच्छ राहण्याची शक्यता आहे. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये पुढील ५ दिवसांत कमाल तापमान २९.० ते ३०.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता आहे. पुढील ५ दिवसांत किमान तापमानामध्ये २ ते ३ अंश सेल्सिअसने घट होऊन किमान तापमान १६.० ते १८.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता आहे. सकाळची सापेक्ष आद्रता ६१ ते ६४% या दरम्यान तर दुपारची सापेक्ष आद्रता ४६ ते ५४% या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. वाऱ्याचा वेग ताशी ०९ ते ११ किमी या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| विस्तारित श्रेणी अंदाज | | विस्तारित श्रेणीच्या अंदाजानुसार मध्य महाराष्ट्रामध्ये दिनांक १९ ते २५ नोव्हेंबर २०२५ दरम्यान पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे तसेच कमाल तापमान सामान्यत: सरासरी पेक्षा कमी तर किमान तापमान सरासरी पेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | ❖ पुढील ५ दिवसांमध्ये किमान तापमान १७.० अंश सेल्सिअस पर्यंत कमी होण्याची शक्यता असल्याने शेतकरी बांधवांनी स्वत:ची व आपल्या पशूधनाची काळजी घ्यावी<br>❖ जमिनीमधील ओलावा टिकवून ठेवण्यासाठी फळे तसेच भाजीपाला पिकांमध्ये आच्छादनांचा वापर करावा.<br>❖ फळे तसेच भाजीपाला पिकांना त्यांच्या आवश्यकतेनुसार पाणी द्यावे. |
| संदेश | | ❖ नोव्हेंबरमध्ये सरासरी बाष्पीभवनाचा वेग ४.१ मी.मी. प्रती दिवस एवढा असतो त्यामुळे ऊस पिकास प्रती दिवस ३.२ लिटर पाण्याची गरज असते त्यासाठी ठिबक सिंचन संच (४लिटरचा ड्रीपर) दररोज ४८ मिनिटे चालू ठेवावा. |
| गहू | मुकुटमुळे फुटणे | ➢ गहू पेरणीस १८ ते २१ दिवस झाले असल्यास मुकुटमुळे फुटण्याची अवस्था असताना पाणी द्यावे. |
| रब्बी ज्वारी | वाढीची | ➢ ज्वारी पिकाच्या सुरुवातीच्या ३५ ते ४० दिवसांत तण व पिकामध्ये जमिनीतून अन्नद्रव्ये शोषण्यासाठी तीव्र स्पर्धा असते त्यामुळे सुरुवातीच्या ३५ ते ४० दिवसांत पिक तण विरहीत ठेवावे.<br>➢ जमिनीमधील ६० ते ७० % ओलावा हा बाष्पीभवानामुळे नाहीसा होतो. जमिनीमधील ओलावा टिकवून ठेवण्यासाठी शेतामध्ये आच्छादनाचा वापर करावा. आच्छादन हे ज्वारी पेरल्यापासून ५० दिवसांच्या आत करावे. आच्छादनामुळे उत्पादनात १४ % नि वाढ होते. |
| भात | पक्वता | ➢ भाताच्या हळव्या व मध्यम पक्व होणाऱ्या जाती पक्व झाल्या असल्यास काढणी करून घ्यावी. भाताच्या लोंब्यामधील ८० ते ९० % दाणे पक्व झाल्याचे दिसताच वैभव विळयाच्या सहाय्याने पिकाची कापणी जमिनीलगत करावी. |
| हरभरा | वाढीची | ➢ जोमदार वाढीसाठी पिक सुरूवातीपासूनच तण विरहीत ठेवावे तसेच पिक २० दिवसांचे झाल्यानंतर पहिली कोळपणी करावी.<br>➢ हरभरा पिकावरील घाटेअळीच्या नियंत्रणासाठी पक्षी थांबे उभारावेत व हेक्टरी ५ या प्रमाणे कामगंध सापळे लावावेत. |
| ऊस | वाढीची | ➢ नोव्हेंबर महिन्यामध्ये सरासरी बाष्पीभवनाचा वेग ४.१ मिमी प्रती दिवस एवढा असतो त्यामुळे ऊस पिकास प्रती दिवस ३.२ लिटर एवढ्या पाण्याची गरज असते त्यामुळे ऊस पिकाची पाण्याची गरज पूर्ण होण्यासाठी ठिबक सिंचन संच (४ लिटरचा ड्रीपर) दररोज ४८ मिनिटे चालू ठेवावा. |
| मिरची | फळ धारणा | ➢ मागील आठवड्यामध्ये ढगाळ हवामान व हवेमध्ये जास्त आद्रता राहिल्यामुळे मिरची पिकावर भुरी रोगाचा प्रादुर्भाव आढळून आलेला आहे. प्रादुर्भाव असल्यास नियंत्रणासाठी मिरची पिकावर टेब्यूकोनेझोल १० मिली किंवा हेक्झाकोनेझोल १० मिली प्रती १० लिटर पाणी याप्रमाणात मिसळून २ ते ३ फवारण्या दर १५ दिवसांच्या अंतराने कराव्यात. |

# ॲग्रोमेट ॲडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर
## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६ ईमेल: adrkolhapur@rediffmail.com

| | | |
|---|---|---|
| आंबा | नवीन पालवी | ➢ मागील आठवड्यामध्ये अंशत: ढगाळ व जास्त आद्रतायुक्त हवामान असल्याने काही ठिकाणी आंब्यामधील नवीन पालवीवर तुडतुडे या किडीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. प्रादुर्भाव दिसून येताच नियंत्रणासाठी आंबा फळझाडावर इमिडॅक्लोप्रीड १७.८ एस.एल. ३ मिली किंवा लॅम्डा सायहॅलोथ्रीन ५% ई.सी. १० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| केळी | वाढीची | ➢ **केळी घडाची गुणवत्ता वाढविणेसाठी करावयाचे संस्कार**<br>➢ घड पुर्ण निसवल्यावर केळफूल वेळीच कापावे.<br>➢ घडावर ८ ते ९ फण्या ठेवून बाकी खालच्या फण्या धारदार विळीने सुरवातीलाच कापुन टाकाव्यात.<br>➢ केळीचा घड पूर्ण निसवल्यावर व तद्नंतर १५ दिवसांनी १० ली. पाण्यात ५० ग्रॅम पोटॅशियम डायहायड्रोजन फॉस्फेट अधिक १०० ग्रॅम युरिया अधिक स्टीकर (१० मिली) मिसळून घडावर फवारणी करावी किंवा<br>➢ केळफुल कापल्यानंतर एकदा व त्यानंतर ३० दिवसांनी दुसऱ्यांदा १० लिटर पाण्यात २०० ग्रॅम सल्फेट ऑफ पोटॅश मिसळून फवारणी करावी.<br>➢ घडावर २ ते ६% सच्छिद्रतेच्या पांढऱ्या पॉलिथीन पिशव्यांचे आवरण करावे.<br>**आंतरपिके**<br>➢ केळीबागेत चवळी, उडीद, मुग, भुईमूग त्याचबरोबर काकडी, भोपळा, कलींगड, खरबुज तसेच मिरची, वांगी यांसारखी पिके घेणे कटाक्षाने टाळावे कारण 'सीएमव्ही' हा रोग वाढण्यास संबंधित पिके कारणीभूत ठरु शकतात.<br>**केळीसाठी आच्छादनाचा वापर**<br>➢ केळीच्या दोन ओळीत एकूण मोकळया जागेच्या ८०% जागेवर ३० मायक्रॉन जाडीचे चंदेरी रंगाचे पॉलीइथिलीनचे आच्छादन केळीची आंतरमशागत केल्यानंतर करावे म्हणजे नोव्हेंबर महिन्यात करावे. |
| हळद | कंद वाढीची | ➢ मागील आठवड्यामध्ये अंशत: ढगाळ व जास्त आद्रतायुक्त हवामान असल्याने काही ठिकाणी कंदमाशीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे नियंत्रणासाठी खालील उपाययोजना कराव्यात.<br>➢ उघडे पडलेले कंद मातीने झाकून घ्यावेत. वेळेवर हळदीची भरणी करावी.<br>➢ हेक्टरी ६ पसरट भांडी (माती अथवा प्लास्टिकची) वापरून प्रत्येक भांड्यात भरडलेले एरंड बी २०० ग्रॅम घेऊन त्यात १.५ लिटर पाणी घ्यावे. ८ ते १० दिवसांनी या मिश्रणातून विशिष्ठ असा वास बाहेर निघू लागल्यावर कांद्माश्या आकर्षित होऊन मारून लागतात. सदरची उपाय योजना सेंद्रिय हळद उत्पादनामध्ये अत्यंत प्रभावी व कमी खर्चिक आहे. |
| पशुधन | वाढीची | ➢ थंडीपासून संरक्षणासाठी जनावरांच्या गोठ्यामधील तापमान नियंत्रणासाठी गोठयाच्या बाजूने पडदे किंवा गोणपाट लावून तापमान नियंत्रित करावे. |
| कुक्कुटपालन | वाढीची | ➢ पुढील ५ दिवस किमान तापमान १६ ते १८ अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता असल्याने पोल्ट्री पक्ष्यांचे थंडीपासून बचावासाठी पोल्ट्री शेड मधील तापमान रात्रीच्या तसेच पहाटेच्या वेळी उबदार राहील याची काळजी घ्यावी |

| | |
|---|---|
| मेघदूत ॲप्लिकेशन डाउनलोड करण्यासाठी स्कॅन करावे | दामिनी ॲप्लिकेशन डाउनलोड करण्यासाठी स्कॅन करावे |

स्त्रोत
१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.
२) मागील हवामान : भारत मौसम विज्ञान विभाग वेधशाळा विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर

ठिकाण : कोल्हापूर
दि. : १४.११.२०२५

स्वाक्षरीत
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, कोल्हापूर तथा**
**सहयोगी संशोधन संचालक,**
**विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर**